# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

### // प्रेस नोट //

**दि.15/07/2025 रोजीच्या दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत खुलासा.**

**बातमी - मिरा भाईंदरमध्ये सोन्याच्या दरात कचऱ्याचा डब्बा.**

दै. लोकसत्ता या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत कचरा साठवण पेट्या खरेदी करणेबाबत डस्टबिन खरेदी करणे, सोलार पॅनेल असलेले स्वयंचलित डस्टबिन खरेदी करणे, स्टेनलेस स्टील/ पावडर कोटेड अॅल्युमिनियम /डस्टबिन (2 बिन, 3 बिन) खरेदी करणे या निविदेबाबत निविदेतील जास्त दराबाबत बातमी प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबतचा खुलासा सादर करण्यात येत आहे.

सदरचे काम शासन निधीतुन असुन या कामाकरीता दरसुची मध्ये दर नसल्याने विहित पध्दतीचा अवलंब करून चालु बाजार भावातील दरानुसार दर निश्चित करून त्यास तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता घेऊन विहित पध्दतीने शासनाच्या वेबसाईटवर www.mahatenders.gov.in वर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या निविदेमधून L1 निविदाधारक यांचे प्राप्त किमान दर विचारात घेऊन निविदा मंजुरीचा ठराव करण्यात आलेला आहे. परंतु याप्रकरणी कोणताही कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आलेला नाही. वरील नमुद कामाच्या सर्व प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने व शासनाने विहित केलेल्या नियमावलीनुसार पार पाडण्यात आलेल्या आहेत.

तथापि, वर्तमानपत्रातील बातमीनुसार या निविदेतील दराबाबत पुनश्च: तांत्रिक बाबी तपासुन त्यानंतरच निविदेबाबत निर्णय घेण्याबाबत मा. आयुक्त यांनी निर्देश दिले आहेत.

15/07/25

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :-**
**मा. आयुक्त**

**प्रत कार्यवाहीस्तव :-**
**सिस्टीम मॅनेजर**
सदरचा खुलासा सर्व वृत्तपत्रधारक (Print media/ Electronic media) यांना कळविण्यात यावा.

Reg. No. 1591/57
१२+ राठ्येतिक ★

मुंबई, मंगळवार, १५ जुलै २०२५ WWW.LOKSATTA.COM

लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

३०५

प्रेम!
उत्पादनातील
निष्कर्षांने
होऊ नये
च...

क्रीडा
**प्रतिस्पर्धी कुणी असो, मला जिंकायचेच होते - सिन्नेर**



# मिरा-भाईंदरमध्ये सोन्याच्या दरात कचऱ्याचा डबा

**मयूर ठाकूर, लोकसत्ता**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात कचरा संकलन करण्यासाठी ७० हजार रुपये प्रतिनग किमतीचे ५०० डबे खरेदी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. याशिवाय साडेनऊ लाख रुपये प्रतिनग किमतीचे २१ स्वयंचलित डबेही घेतले जातील. एकूण ३,८८९ डब्यांच्या खरेदीसाठी १९ कोटी रुपयांचा खर्च होणार असून, महापालिकेने यास नुकतीच मंजुरी दिली आहे.

शहरातील स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेने विविध ठिकाणी कचराकुंड्या उभारल्या आहेत. तसेच, गृहसंकुलांतून कचरा गोळा करण्यासाठी आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या क्षमतेचे कचरा डबे बसवण्यात आले आहेत.

**मिरा-भाईंदर महापालिका कचऱ्याच्या ३८८९ डब्यांसाठी १९ कोटी खर्च करणार आहे. एका डब्याची किंमत ७० हजार रुपये आहे. महापालिकेने याबाबतची मंजुरीही दिली आहे.**




## अधिकाऱ्यांचा गोंधळ

महापालिकेने मंजूर केलेल्या ठरावाबाबत विचारणा करण्यात आली असता आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी सविस्तर माहिती नसल्याचे सांगितले. तसेच बाजारभावापेक्षा अधिक दराने डबे खरेदी केले जात असतील, तर यासंदर्भात माहिती घेतली जाईल, अशी प्रतिक्रिया दिली. घनकचरा विभागाचे उपायुक्त सचिन बांगर यांनादेखील डब्याच्या प्रति नग किमतीबाबत विचारले असता, प्रत्यक्ष दर कमी असून ठरावात नमूद दरांची माहिती घेतली जाईल, असे स्पष्ट केले.

गेल्या काही वर्षांत डबे खराब झाले आहेत. त्यामुळे नव्याने डबे बसवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

डबे खरेदीसाठी महापालिकेने निविदा प्रसिद्ध केली होती. त्याअंतर्गत 'कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' या संस्थेला हे कंत्राट देण्यात आले आहे. यामध्ये एकूण ३,८८९ डबे (पान १० वर)

# मिरा-भाईंदरमध्ये सोन्याच्या दरात कचऱ्याचा डबा

(पान १ वरून)

खरेदी करण्यात येणार आहेत. मात्र कंत्राटदाराने सादर केलेले दर पाहता धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. विशेषतः, स्टेनलेस स्टील पावडर कोटेड बिन्ससाठी प्रति नग किंमत ही ६६ हजार १८३ तर स्टेनलेस स्टील-ॲल्युमिनियम कोटेड बिन्ससाठी ही किंमत ६९ हजार ६६८ आहे. याशिवाय, ऑटोमॅटिक डब्याची किंमत ९ लाख ३४ हजार ५६० प्रतिनग असून, फायबर ड[illegible] ३४ हजार ५५१ प्रति नग अशी नमूद [illegible]ण्यात आली आहे. या दरांशी तुलना करता, बाजारभावानुसार हे दर ७ ते ८ पट अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे.

**डब्यांच्या सुरक्षेचे काय?**

महापालिकेने साडेनऊ लाख रुपये प्रति नग किमतीचे नवे ऑटोमॅटिक डब्बे शहरात बसवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र एवढ्या महागड्या डब्यांची सुरक्षा कशी आणि कोणाच्या जबाबदारीने केली जाणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## महापालिकेने मंजूर केलेल्या डब्यांचे दर

| डबा | संख्या | प्रति नग दर | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| स्टेनलेस स्टील- २ बिन | ५०० | ६६,१८३ | ३,३०,९१,५०० |
| स्टेनलेस स्टील -३ बिन | ५०० | ६९,६६८ | ३,४८,४४,००० |
| ऑटोमॅटिक डबे | २१ | ९,३४, ६६० | १,९६,२५,७६० |
| फायबर डबे | २,८६८ | ३४, ५१८ | ९,९९,७८,४८० |